ePaper

## सरकारच्या कार्यक्रमात अडगळ नको म्हणूनच जालन्यात लाठीहल्ला: उद्धव ठाकरे



वर्ष - 7 । अंक - 121 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । रविवार , दिनांक 3 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- भारत पाकिस्तान सामना रद्द!
- तमन्नाचे चित्रपटसृष्टीत 18 वर्षे पूर्ण!
- भाजपाला मोठा धक्का!
- आरक्षणाचा निर्णय घेऊन दाखवा!

# पुणेकरांसाठी पाण्याचे 'नो टेन्शन'

## » पालकमंत्री चंद्रकांत पाटलांचा दिलासा : ऑक्टोबरमध्ये पुन्हा आढावा घेणार

**।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**सध्या खडकवासला प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा असल्याने पुणे शहराच्या पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नाही तसेच सुरू असलेले सिंचनाचे आवर्तनही नियोजनाप्रमाणे सुरू राहील. पावसाचा परिस्थिती पाहून ऑक्टोबरमध्ये पुन्हा आढावा घेऊन नियोजन करण्यात येईल, असे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कालवे सल्लागार समितीच्या बैठकीत स्पष्ट केले.**



खडकवासला प्रकल्प कालवे सल्लागार समिती बैठकीस राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार राहूल कुल, अशोक पवार, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रमकुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणुमंत गुणाले, अधीक्षक अभियंता सुनंदा जगताप आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, यंदा पावसाचे प्रमाण कमी आहे. तथापि, सद्यस्थितीत खडकवासला प्रकल्पातील धरणाची स्थिती चांगली आहे. पुढील महिन्याभरात पावसाचे प्रमाण कसे राहते त्यावर लक्ष ठेऊन ऑक्टोबरमध्ये पुढील नियोजन ठरविण्यात येईल. पवना व चासकमान मध्ये १०० टक्के पाणीसाठा झाला असून भामा आसखेडमध्येही समाधानकारक पाणीसाठा आहे. त्यामुळे सद्यस्थितीत या प्रकल्पांच्या पाणी नियोजनाबाबत कोणतीही अडचण नाही असे जलसंपदा विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

### नीरा प्रणालीत समाधानकारक पाणी

**» नीरा प्रणालीमध्ये गतवर्षीच्या तुलनेत ४ टीएमसी ने पाणीसाठा कमी असून उपयुक्त पाणीसाठा ९१ टक्के आहे. सध्यातरी समाधानकारक पाणीसाठा आहे. तथापि, लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे पिण्यासाठी तसेच सिंचनासाठी पाणी समन्यायी पद्धतीने सर्वांना मिळेल यासाठी नियोजन करावे, अशा सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या. कालव्याच्या टेलच्या भागातील शेतीला योग्य दाबाने पाणी मिळावे यासाठी प्रयत्न करा, त्यासाठी कालवेक्षेत्रातील पाणी उपशावर नियंत्रण आणण्यासाठी आवश्यकता भासल्यास ठराविक वेळेतच वीजपुरवठा करा. अवैध पाणीवापरावर नियंत्रण आणण्यासाठी मनुष्यबळाचे फेरनियोजन करत इतर ठिकाणचे मनुष्यबळ सिंचन व्यवस्थापनावर वापरात आणावे. बाह्य स्रोताद्वारे तात्पुरते मनुष्यबळ घेण्यात यावे, अशा सूचना महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केल्या.**

# 'स्वच्छ - सुंदर' शहरासाठी प्रशासनाचा 'संकल्प'!

## » प्रकल्पांना चालना द्या : अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांची सूचना

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महापालिकेकडून आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपाययोजना करण्यात येत असून, त्या अनुषंगाने योजनेचा एक भाग म्हणून शहरातील राडारोडा गोळा करून सीएनडी वेस्ट प्रकल्पांतर्गत पाठविण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी संबंधित विभागांना दिले.**



महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी आज सकाळी मोशी कचरा डेपो व परिसरास भेट देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. मोशी कचरा डेपो, मेकॅनिकल कंपोस्टिंग सीएनडी वेस्ट, बायोगॅस प्लॅन्ट, बायोमेडिकल प्लॅन्ट या सर्व ठिकाणी त्यांनी भेटी देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि अर्धवट राहिलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधितांना निर्देशही दिले.

या पाहणी दरम्यान त्यांच्यासोबत सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, आरोग्य निरीक्षक सुशील मलये त्याचप्रमाणे अंतोनी लारा आणि सीएनडी वेस्ट प्रकल्पांचे अधिकारी उपस्थित होते.

### पर्यावरण विभागाला सूचना...

**» यावेळी शहरातील राडारोडा गोळा करून त्यावर सीएनडी वेस्ट प्रकल्पात त्वरित प्रक्रिया करावी, मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प, बायोमेडीकल प्रकल्प, बायोगॅस प्रकल्पास गती द्यावी, तसेच नव्याने सुरू होत असलेल्या वेस्ट टु एनर्जी प्रकल्पासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही खोराटे यांनी पर्यावरण विभागास केल्या.**

# फडणवीसांचा राजीनामा मागण्याचा नैतिक अधिकार शरद पवार यांना नाही!

## राधाकृष्ण विखे पाटीलः उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर लाठीचार्जप्रकरण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर काल पोलिसांनी लाठीचार्ज केल्याची घटना घडली.या घटनेचे पडसाद राज्यभरात उमटण्यास सुरुवात झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज जालना येथील आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन विचारपूस केली.तर त्यावेळी शरद पवार यांनी प्रसार माध्यमाशी संवाद साधताना भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली.शरद पवार यांच्या या भूमिकेनंतर भाजपच्या अनेक नेत्यांच्या प्रतिक्रिया येत आहे.**



त्याच दरम्यान भाजपचे नेते मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे पुणे दौऱ्यावर होते.त्यावेळी शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.हा प्रश्न राधाकृष्ण विखे पाटील यांना विचारताच ते म्हणाले की,भाजपचे नेते उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा मागण्याचा नैतिक अधिकार शरद पवार यांना नाही.भाजप सरकारच्या काळात मराठा आरक्षण टिकविण्याचं काम देवेंद्र फडणवीस यांनी केले.पण शरद पवार यांनी मराठा आरक्षणासाठी एक तरी प्रयत्न केला का ? हे स्वतः शरद पवार यांनी सांगावे.कायम आरक्षण विरोधात त्यांनी भूमिका मांडली आहे.ही बाब सर्वांनी माहिती आहे.तुम्ही देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा मागण्या ऐवजी उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री होते.त्यावेळी त्यांनी मराठा आरक्षण घालवले. तेव्हा उद्धव ठाकरे यांचा राजीनामा का मागितला नाही. अशा शब्दात शरद पवार यांच्यावर त्यांनी निशाणा साधला.

तसेच ते पुढे म्हणाले की,जालना येथे मराठा आरक्षणासाठी जे आंदोलन करण्यासाठी नागरिक बसले होते.त्या आंदोलनकर्त्यांवर लाठीचार्ज झाला.त्या संदर्भात राज्य सरकारने चौकशीचे आदेश दिले आहेत.त्यामधून वस्तुस्थिती समोर येणार आहे.त्या घटनेच कोणीही समर्थन करीत नाही.पण राज्यातील मराठा समाजाने शांत राहण्याचे आवाहन करीत आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरात ५८ मोर्चे काढण्यात आले.त्यावेळी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते.त्यावेळी त्यांनी मागास आयोगाची स्थापना केली होती आणि सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक भूमिका मांडली होती. त्यामुळे मराठा समाजाला आम्ही आरक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याची भूमिका देखील यावेळी त्यांनी मांडली.

### उद्धव ठाकरे यांनी थोड तारतम्य बाळगण्याची गरज

**संसदेच्या अधिवेशनात वटहुकूम काढून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.त्या प्रश्नावर राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की,उद्धव ठाकरे यांनी थोड तारतम्य बाळगण्याची गरज असून तुम्ही अडीच वर्ष मुख्यमंत्री होता.त्यावेळी तुम्ही काय दिवे लावले.हे आम्हाला समजू द्या,तुम्ही सरकारी वकीलास कागदपत्र दिली आणि फी देखील दिली नाही. त्यामुळे समाज बांधवांना एकच सांगू इच्छितो की, हे बोलघेवडे लोक तुमचा प्रश्न सोडविण्यापेक्षा अधिक पेटवत ठेवतील आणि राजकीय हित जोपासण्याच करतील अशा शब्दात उद्धव ठाकरे यांच्यावर त्यांनी टीका केली.**

# जालन्यातील घटनेची धग बारामतीपर्यंत

## अखिल भारतीय मराठा महासंघाचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालना येथे आरक्षण मागणीसाठी सनदशीर मार्गाने उपोषणकर्त्यांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठी हल्ल्याचा बारामतीत निषेध नोंदविण्यात आला. यावेळी लाठी हल्ल्याचा आदेश देणाऱ्या वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि लाठी हल्ला करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कायमस्वरूपी निलंबित करण्याची मागणी अखिल भारतीय मराठा महासंघ बारामती यांच्या वतीने करण्यात आली.**



### लाठीमाराचे पडसाद राज्यभर उमटले

यावेळी हिंदू राष्ट्र सेनेच्या वतीने मराठा समाजावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करत हिंदू राष्ट्र सेना बारामती यांच्यावतीने देखील निवेदन देऊन निषेध करत मराठा समाजाला पाठिंबा देण्यात आला. यावेळी हिंदू राष्ट्र सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच महिला,पुरुष,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी गावातील लाठीमाराचे पडसाद राज्यभर उमटले आहेत.

यावेळी सकल मराठा समाज,अखिल भारतीय मराठा महासंघ, हिंदू राष्ट्र सेना,शिवजयंती महोत्सव समिती, मराठा सेवा संघ व इतर संघटना यांच्या वतीने नायब तहसीलदार भाऊसाहेब करे व शहर पोलीस निरीक्षक विनोद तायडे यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी महिला,पुरुष,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर भ्याड हल्ल्याची या सरकारला मोठी किंमत मोजावी लागेल. सरकारने मराठा समाजाला गृहीत धरू नये, यापूर्वी झालेल्या मराठा समाजाच्या आंदोलनात टाचणी पडली तरी आवाज येईल असं असताना काल उपोषण कर्त्यांवर झालेला हल्ला या मागील गौड बंगाल काय आहे..याचा सखोल तपास करण्याची मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाकडून करण्यात आली. मराठा समाज रस्त्यावर उतरला तर प्रशासनाला पळता भुई थोडी होईल. मराठा समाजाच्या संयमाचा अंत बघू नये अशा संतप्त प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी बारामती बंदचा इशारा देखील देण्यात आला आहे. अखिल मराठा महासंघाचे तालुकाध्यक्ष संभाजी माने, माळेगाव साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र ढवाण,शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष सुनील शिंदे , हेमंत नवसारे,संदीप मोहिते,रोहन शेरकर,सागर खलाटे,अर्चना सातव,शिवानी काटे यांनी सरकारचा निषेध करत सोमवारी बारामती बंद ठेऊन मूक मोर्चा काढणार असल्याचे यावेळी सांगितले.

# लोणावळ्यामध्ये पावसाची तुफान बॅटिंग



। लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

लोणावळ्यात तीन आठवड्यानंतर पावसाने जोरदार हजेरी लावली. गेल्या २४ तासात १०० मिलिमीटर इतका पाऊस कोसळला आहे. यामुळे लोणावळ्यातील व्यावसायिक आनंदी आहेत. गेल्या काही दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्यानंतर लोणावळ्यात देखील पर्यटकांची गर्दी ओसरली होती. पुन्हा एकदा आता लोणावळ्यामध्ये पर्यटकांची गर्दी होईल अशी आशा व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. पुणे जिल्ह्यात लोणावळा ही पर्यटन नगरी म्हणून ओळखला जातो. पावसाने दडी मारल्याने पर्यटन नगरीकडे गेल्या काही दिवसांपासून पर्यटकांनी देखील पाठ फिरवली होती. पण शुक्रवार रात्रीपासून पावसाने तुफान बॅटिंग करत लोणावळाकरांना झोडपून काढलं आहे.

गेल्या २४ तासात लोणावळ्यामध्ये १०० मिलिमीटर पाऊस कोसळला आहे. गेल्या वर्षी याच काळात ४५८३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. यावर्षी आत्तापर्यंत ३८०६ मीटर पावसाची नोंद झालेली आहे. पावसाच्या हजेरीमुळे शनिवार आणि रविवार या दिवशी लोणावळ्यात पुन्हा एकदा गर्दी होण्याची शक्यता आहे.

# पवना धरणातून विसर्ग!

## धरणक्षेत्रात जोरदार पाऊस : नागरिकांना सतर्कतेचा इशारा

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील पंधरा दिवस दडी मारलेल्या पावसाने शुक्रवारी रात्रीपासून जोरात हजेरी लावली आहे. मावळसह पिंपरी-चिंचवड शहर परिसरात जोरदार पाऊस पडला आहे. पवना धरण १०० टक्के भरले असून धरणातून १४०० क्यूसेक्सने विसर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.**



पवना धरण १०० टक्के क्षमतेने भरले आहे. वीज निर्मिती ग्रहाद्वारे पवना नदीमध्ये पिण्यासाठी व सिंचनासाठी सकाळी साडे नऊ वाजता ८०० क्यूसेक्स विसर्ग करण्यात आलेला आहे. हा विसर्ग बारा वाजता १४०० क्यूसेक्स करण्यात येणार आहे. तसेच धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण पाहता कधीही पवना धरणाच्या सांडव्यावरून पवना नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्याची शक्यता आहे.

पवना नदी काठच्या सर्व नागरिकांनी सतर्क रहावे. नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदीमधील पाण्याचे पंप, नदी काठची शेतीची अवजारे, जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत, असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाने केले आहे.

### पावसाचे पुनरागमन...

पुणे आणि परिसरात रात्री बारा वाजल्यापासून संततधार पाऊस सुरू आहे. सर्वाधिक ८३.५ मिलिमीटर पावसाची नोंद पिंपरी चिंचवडमध्ये झाली आहे. मगरपट्टा सिटीत ५४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. मोसमी पावसाच्या यंदाच्या हंगामात म्हणजे जूनपासून ऑगस्टअखेर पुण्याला संततधार पावसाने हुलकावणी दिली होती. हंगामात पहिल्यांदाच अशा प्रकारचा संततधार पाऊस पुण्यात होत आहे. त्यामुळे पुणेकर सुखावले आहेत. रात्री साधारण बारानंतर सुरू झालेला संततधार पाऊस सकाळी दहा वाजेपर्यंत सुरूच होता. या काळात सर्वाधिक पाऊस पावसाची नोंद पिंपरी चिंचवड परिसरात झाली असून, ८३.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्या खालोखाल मगरपट्टा सिटीत ५४ मिलिमीटर पावसाचे

# ... हा तर फडणवीसांचा मराठा द्वेष!

## इम्रान शेख यांची टीका : आंदोलकांवरील लाठीचार्ज प्रकरणी निषेध

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलकांवरील लाठीहल्ला म्हणजे देवेंद्र फडणवीसांच्या मनातील मराठा द्वेष आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी केली आहे.**




जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात शांततेच्या मार्गाने मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीहल्ला केला. या घटनेचे पडसाद राज्यभरात उमटत आहेत. आज शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंख्या पदाधिकाऱ्यांनी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात आंदोलन केले. यावेळी महाराष्ट्र सरकारचा निषेध करण्यात आला.

यावेळी युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले की राज्यातील प्रत्येक आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सातत्याने देवेंद्र फडणवीस यांच्या कडून होत आहे. या सरकारने दिव्यांग, वारकरी, विद्यार्थी आणि आता मराठा आंदोलक यांच्यावर पोलिसांकरवी हल्ला करवून हुकुमशाहीचे प्रत्यंतर राज्याला दाखवले आहे. मराठा आरक्षण मागण्यासाठी राज्यभर लाखोंच्या आंदोलन यापूर्वी देखील झाले आहेत परंतु लाखोंच्या संख्येने जमलेले मराठा बांधव यांनी कधी त्या मोर्चाला गालबोट लावल्याचे प्रकार या महाराष्ट्रात घडलेला नाही. काल झालेल्या घटनेसाठी सर्वस्वी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार असून सरकारी यंत्रणेच्या खांद्यावर बंदूक ठेवून गोळी चालवण्याचे प्रकार देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात करत असल्याची टीका यांनी इम्रान शेख यांनी केली. काशिनाथ नखाते म्हणाले महाराष्ट्रातील महापुरुषांच्या अवमान , व लोकशाही मार्गाने जनतेच्या प्रश्नांवर आंदोलने करणाऱ्यावर दडपशाही करण्याचे प्रकार भाजपच्या काळात वाढले असून भाजपा व फडणवीस यांनी सरकारने न टिकणारे मराठा आरक्षण देऊन दिशाभूल केली. कालचे जालना येथील मराठा आंदोलन राज्यात वनवा करणार म्हणून त्यांना भीती आहे त्यामुळेच लाठीचार्ज केला मात्र आता सरकारला राज्यातील जनता माफ करणार नाही.

### उत्तर आता मतदानातून मिळेल : सुनील गव्हाणे

**प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे म्हणाले की, आंदोलकांवर केलेला हल्ला निषेधार्थ आहे. शहरातील आमदारांनी या घटनेच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरून आंदोलन करायला हवे होते. मात्र भाजपा आमदार हे त्यांच्या नेत्यांच्या एवढे दडपणाखाली आहेत की साधा निषेध करायला हि ते धजावत नाहीत. येणाऱ्या काळात शहरातील मराठा समाज याच उत्तर मतदानाच्या माध्यमातुन नक्की देईल.**

# इस्रोचे यश भारताचेही आहे




**मी रोमानियामध्ये काही काळ काम केले आहे. रुमानियामधून इंग्लंड, जर्मनी किंवा फ्रान्ससारख्या युरोपातील विकसित देशांमध्ये जाणारे संभाव्य बेकादेशीर स्थलांतरित लोक या नजरेने भारतातून आलेल्या स्त्रीपुरूषांकडे बघितलं जात असे हे तिथे काम केल्यामुळे मला माहीत आहे. पण चंद्रावर केलेल्या यशस्वी लॅण्डिंगमुळे किमान तात्पुरता तरी आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल असं मला वाटतं.**

भारत आणि भारतीयांचा आता परदेशात अधिक सन्मान होईल. परदेशातील विमानतळांवरील डेस्कचे व्यवस्थापन करणाऱ्या इमिग्रेशन अधिकाऱ्यांना भारतीय पासपोर्ट असणाऱ्यांबाबत नेहमीच संशय असतो. भारतीय पासपोर्ट असलेल्यांना थांबवून ठेवून इतर देशांच्या लोकांना जाऊ देऊन, वरिष्ठांशी सल्लामसलत केल्यानंतर आणि सामान्यत: तुम्ही नको असलेले पाहुणे आहात हे आपल्याला पुरेसं जाणवून दिल्यानंतर, ते शेवटी आणि अदी अनिच्छेने आपल्याला त्यांच्या देशात प्रवेश करू देतात. आपल्या देशात राहण्याबाबद हवालदिल झालेले आपलेच काही स्त्रीपुरूष नागरिक चांगल्या दर्जाचं जीवन जगायला मिळावं यासाठी पश्चिम युरोप, उत्तर अमेरिका किंवा ऑस्ट्रेलियामध्ये जाऊन राहता यावं, आटोकाट प्रयत्न करत असतात. आता आपल्या



चंद्रावतरणानंतर ही परिस्थिती बदलेल, ही मला आशा आहे. भारतीय पासपोर्टचं आता जगात सगळीकडे स्वागत होईल असं मला वाटतं. परदेशात प्रवास करणाऱ्या भारतीयांच्या दृष्टीने या उत्कृष्ट वैज्ञानिक पराक्रमाचा अर्थ काहीही असो, त्याचा कमालीचा परिणाम देशातच राहणाऱ्या भारतीयांवर झाला आहे. सर्व देशाभिमानी भारतीयांप्रमाणे मीदेखील चांद्रयान-३ चंद्रावर हळूवारपणे उतरताना बघितलं. बंगळुरू येथील इस्रोच्या मुख्यालयात हजारो हातांच्या टाळ्यांचा कडकडाट मी ऐकला आणि अर्थातच, त्याच वेळी आपले सर्वव्यापी पंतप्रधान जोहान्सबर्ग येथून स्क्रीनवर झळकताना पाहिले, तेथे ते पाच राज्यांच्या प्रमुखांच्या ब्रिक्स बैठकीला उपस्थित होते.

या आनंदाच्या प्रसंगी मोदींनी इस्रोतील वैज्ञानिकांच्या समुदायाशी आणि देशवासीयांशी संवाद साधला. आपले यान चंद्रावर उतरण्याच्या त्या क्षणी प्रत्येक भारतीयाच्या नसानसात कर्तृत्वाची आणि विजयाची भावना होती. पंतप्रधानांना तर ती अधिकच तीव्रतेने जाणवली असणार. कारण बरेच भारतीय नागरिक या पराक्रमाचे श्रेय त्यांना देतील आणि त्याचा अर्थ तिसऱ्यांदा निवडून येण्यासाठी ते किती महत्त्वाचं आहे, याची त्यांना नक्कीच जाणीव आहे. मी या सगळ्याबाबत ज्यांच्या ज्यांच्याशी बोललो ते सगळे बहुतेक लोक, नोकरीधंदा करणारे लोक होते. आपला अवकाश कार्यक्रम स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू झाला, हे त्यांना माहीत होते. या दोन्ही क्षेत्रातील प्रणेते होमी भाभा आणि विक्रम साराभाई यांनी १९६२ मध्ये केरळमधील थुंबा येथे एक अंतराळ स्थानक उभारले होते.

ही जमीन एका लॅटिन कॅथलिक चर्चची होती. त्या चर्चचे धर्मगुरू फादर फर्नांडिस यांनी राष्ट्रीय कारणासाठी ही जमीन या राष्ट्रीय ख्यातीच्या शास्त्रज्ञांना देण्यासाठी आपल्या तेथील रहिवाशांची परवानगी घेतली. त्यानंतर थुंबा इक्वेटोरियल रॅकेट लॉन्चिंग स्टेशनचा जन्म झाला. तेथून भारताचे पहिले रॅकेट सोडण्यात आले. थुंबा हे विषुववृत्ताच्या अगदी जवळ होते. इस्रोसाठी आवश्यक असलेले वेगवेगळे प्रयोग आणि संशोधनासाठी ते आदर्श होते. त्यानंतर देशाच्या पूर्व किनारपट्टीला लागून असलेल्या आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथे लॉन्चिंग पॅडची स्थापना करण्यात आली. चांद्रयान -३ चे प्रक्षेपण श्रीहरिकोटा येथून करण्यात आले होते परंतु इस्रोची त्याआधीची प्रक्षेपणे केरळच्या कॅथोलिकांनी देशभक्तीच्या भावनेतून इस्रोला दिलेल्या जमिनीवरून थुंबा येथून झाली. एक सहधर्मवादी म्हणून मला त्यांचा अभिमान आहे.

नरेंद्र मोदींकडे नेतृत्व हे जन्मजात आहे. साधी राहणी, नियमित योगाभ्यास यामुळे ते एकदम तंदुरुस्त आहेत. त्यामुळे ते दिवसाचे १६ ते १८ तास काम करतात. त्यांना माफक आहार आणि जेमतेम चार तासांची झोप घेऊनही ते एकदम ताजेतवाने आणि सतर्क असतात. ते सतत फिरत असतात. वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन ते जी भाषणं करतात, त्यातला प३त्येक शब्द उचलला जातो. आता २०२४ च्या निवडणुका जवळ आल्यामुळे ते निवडणुकीच्या मानसिकतेत आहेत. पुढील वर्षी लोकसभेच्या निवडणुका होण्याची शक्यता असल्यामुळे एप्रिलपर्यंत त्यांची ही मानसिकता कायम राहील.

## संपादकीय »

### साच्याबाहेरची भाषा..

***पिढ्यानपिढ्या रूढ झालेल्या, म्हणून नेहमीच्या शब्दांमधून आपण स्त्रीवर अन्याय करतो आहोत, ही जाणीव होऊन शब्द बदलणे हेसुद्धा संवेदनशीलतेचे लक्षण..***

विधवा, व्यभिचारी, वेश्या, रखेल, रांड, कलंकिनी, अपवित्र, पापी, कुलटा, उनाड, घर फोडणारी, वांझ, पतिता, टाकलेली, ठेवलेली, वापरलेली बाई.. या आणि अशा अनेक शब्दांशी संबंधित कोणतीही कृती संबंधित स्त्रीने एकटीने आणि हौसमौज म्हणून केलेली नसते. पण तिचे सामाजिक स्थान दाखवून देण्यासाठी या शेलक्या विशेषणांनी तिची संभावना केली जाते आणि ती कुणालाच चुकीची वाटत नाही. उलट असे शब्द वापरून संबंधित स्त्रीची अधिकाधिक मानहानी करणे, तिची स्वाभिमानाची नांगी ठेचणे हाच सार्वत्रिक उद्योग आपल्या समाजात सुरू असतो. आपल्या कर्तृत्वाने सर्वोच्च पदावर पोहोचलेली स्त्रीही त्यामधून सुटत नाही. पुरुषप्रधान मानसिकतेचे हे हलाहल पचवून पुढे जात राहण्याशिवाय पर्याय नाही, हे वास्तव स्त्रियांनी त्यांच्या पातळीवर स्वीकारले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

**सरकारने कोणते प्रकल्प हाती घ्यावेत, त्यासाठी खर्च किती येईल आणि लाभ-हानी कोणती होईल याचा नेमका अंदाज घेण्यापासून ते सरकारी धोरणे कशी असावीत- काळानुरूप ध्येयधोरणांत कोणते बदल अपेक्षित आहेत, याची पूर्वतयारी करण्यापर्यंत सर्व कामांसाठी सरकारकडे माणसे असतात. 'भारतीय प्रशासकीय सेवे'साठी किती चुरशीनंतर ही माणसे निवडली जातात हे निराळे सांगायला नको... पण तरीही केंद्र सरकार काय, राज्य सरकारे काय किंवा सार्वजनिक उपक्रमसुद्धा...**

# सल्लागार कंपन्यांचे भूत उतरवायलाच हवे...

सर्वत्रच 'सल्लागार कंपन्यां'चा सुळसुळाट आज दिसून येतो. याचे कारण स्वत:च्याच यंत्रणेची सक्षमता नीट न ओळखता येत नाही किंवा ही यंत्रणा सक्षम असूच नये, यामध्ये अनेकांची सोय असते- या दोनपैकी एकात शोधावे लागेल! एक प्रकारे, सरकारी यंत्रणांनी जो विचार करायचा तो 'विचार करण्याचे' कंत्राट बाहेरच्या, अनेकदा बहुराष्ट्रीय कंपन्यांना दिले जाते आहे. हे 'विचाराचे कंत्राटीकरण' सरकारला महागातच पडते तसे कसे, याचे अभ्यास याआधीही झालेले आहेत. ('द बिग कॉन' नावाचे मारियाना फ्रान्चेन्स्का मॅझ्युकाटो आणि रोझी कॉलिन्टन लिखित पुस्तक किंवा 'व्हेन मॅकिन्से कम्स टु टाउन' हे वॉल्ट बोग्डानिश आणि मायकल फोरसिथ लिखित 'पुलित्झर'विजेते पुस्तक ही अशाच अभ्यासांची उदाहरणे). पण धोरणे ठरवताना असे कंत्राटी सल्ले घेणे राष्ट्रहितासाठी कसे बाधक ठरते, आपल्याच यंत्रणा आणि त्या यंत्रणेच्या क्षमता यांच्याकडे दुर्लक्ष कसे वाईट



असते, हेसुद्धा आपल्याला 'तीन नव्या शेती कायद्यां'च्या वेळी दिसून आलेले आहे! या कंत्राटी 'कन्सल्टन्सी' कंपन्यांवर आणि त्यांच्या व्यवहारांवर अन्य देशांनी निर्बंध घातले आहेत. अमेरिकेत काही लेखापरीक्षण कंपन्याच तेथील अन्य कॉर्पोरेट कंपन्यांना 'व्यवस्थापकीय सल्ला' देण्याचेही काम करत. लेखापरीक्षकाचा ग्राहक तोच सल्लागाराचाही ग्राहक, त्यामुळे लेखापरीक्षण फसवे असण्याची शक्यता उरे. हा प्रकार बंद करण्यासाठी २००२ मध्ये 'सारबेन्स-ऑक्स्ली कायदा' संमत झाला. जर्मनीने तर सरळ सरकारचीच 'सल्लागार कंपनी' स्थापन केली. जर्मनीच्या सरकारी विभागांना सल्ला हवाच असेल तर तो याच सार्वजनिक क्षेत्रातील सल्लागार कंपनीमार्फत घ्यावा लागतो. हाच मार्ग डेन्मार्कनेही २०१७ मध्ये निवडला 'बाहेरच्या कंपन्यांमुळे सरकारी निर्णयांवर अनिष्ट परिणाम होतो आहे' अशा निष्कर्षापर्यंत डेन्मार्कमधील चौकशी पोहोचल्यानंतर तातडीने तेथे हा मार्ग निवडण्यात आला. ऑस्ट्रेलियात 'पीडब्ल्युसी' (प्राइस- वॉटरहाउस कूपर्स) कंपनीबाबत बऱ्याच तक्रारी आल्यामुळे तेथील सरकारी यंत्रणांनी या विशिष्ट कंपनीला दिलेल्या कंत्राटांची चौकशी होत असल्याच्या बातम्या आहेत. चीनने बहुराष्ट्रीय सल्लागार कंपन्यांवर 'तुम्ही तुमच्या बिगरचिनी ग्राहक-कंपन्यांना आमच्या चिनी कंपन्यांची गोपनीय माहिती पुरवता' असा आरोप ठेवून दणकाच दिला आहे. भारतातील प्रश्न तर, 'आधार'ची विदा (डेटा) खरोखरच गोपनीय राहाते की या साऱ्या कंपन्यांना विनायासायास मिळते इथपासून सुरू होता. सध्या 'लागवडीखालील क्षेत्राचे देशव्यापी डिजिटायझेशन' असा जो प्रकल्प (ॲग्रिस्टॅक) सुरू आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आरक्षणाचा निर्णय घेऊन दाखवा!

## » उद्धव ठाकरेंची मोदी सरकारकडे मागणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालन्यातील अंतरवाली सराटी गावात मराठा आरक्षणाची मागणी करत मराठा समाजबांधव उपोषणाला बसलेले असताना त्यांच्यावर पोलिसांनी लाठीहल्ला केल्याची घटना शुक्रवारी (१ सप्टेंबर) सायंकाळी घडली. या घटनेचे राज्यभर पडसाद उमटू लागले आहेत. अशातच राज्यातल्या विरोधी पक्षांचे नेते अंतरवाली सराटी गावात जाऊन मराठा आंदोलकांची भेट घेत आहेत.**



काही वेळापूर्वी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी अंतरवाली सराटी गावात जाऊन आंदोलकांची भेट घेतली. हे आंदोलन ज्या मनोज जरांगे पाटील (मराठा मोर्चाचे समन्वयक) यांच्या नेतृत्वात सुरू आहे त्यांच्याशी चर्चा केली. या चर्चेनंतर उद्धव ठाकरे यांनी आंदोलकांना संबोधित केलं. उद्धव ठाकरे म्हणाले, राज्यात अडीच वर्ष आपलं (महाविकास आघाडीचं) सरकार होतं. या काळातही आरक्षणासाठी वेगवेगळी आंदोलनं झाली. मराठा समाजाचा लढा सुरू होता. परंतु, आपल्या सरकारच्या काळात असा लाठीमार झाला का? मुंबईतही आंदोलनं झाली, आझाद मैदानात आंदोलनं झाली, परंतु, आंदोलकांवर कोणी लाठ्या उगारल्या नाहीत. या सरकारच्या काळातच असं का घडतंय? शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख म्हणाले, केंद्र सरकारने ऐन गणेशोत्सवात संसदेचं अधिवेशन बोलावलं आहे.

मोदी सरकारने अधिवेशनासाठी काय मुहूर्त शोधलाय बघा. हिंदुंच्या सणांना आडवं कसं जायचं हे पाहतायत. हे अधिवेशन त्यांनी का बोलावलं आहे याची माहिती नाही. मी म्हणेन आता अधिवेशन बोलावलंच आहे तर मग या अधिवेशनात सर्व समाजांना न्याय द्या. उद्धव ठाकरे म्हणाले, ज्याप्रमाणे दिल्ली सरकारचे सगळे अधिकार तुम्ही काढून घेतले. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊनही संसदेत तो विषय तुम्ही पुन्हा आणलात. त्यानंतर तुमच्या पाशवी बहुमताच्या जोरावर तुम्ही तो निर्णय उलटा फिरवलात. आता संसदेत तसाच निर्णय घेऊन मराठा, ओबीसी, धनगर आणि इतर समाजांना न्याय द्या. जे समाज न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत त्या सर्वांना न्याय द्या. हे गरिबांचं सरकार आहे ना? मग हे लोक हिंदू नाहीत का? यांच्यावर लाठीहल्ला केलात, यांचा गुन्हा काय आहे? जर तुम्ही येत्या अधिवेशनात या समाजांसाठी निर्णय घेणार असाल तर तुमच्या अधिवेशन घेण्याच्या या निर्णयाचं आम्ही स्वागत करतो. माझ्या समाजाच्या भावनेचा आदर करा.

### समाजाच्या भावनेचा आदर करा

» उद्धव ठाकरे म्हणाले, ज्याप्रमाणे दिल्ली सरकारचे सगळे अधिकार तुम्ही काढून घेतले. सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊनही संसदेत तो विषय तुम्ही पुन्हा आणलात. त्यानंतर तुमच्या पाशवी बहुमताच्या जोरावर तुम्ही तो निर्णय उलटा फिरवलात. आता संसदेत तसाच निर्णय घेऊन मराठा, ओबीसी, धनगर आणि इतर समाजांना न्याय द्या. जे समाज न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत त्या सर्वांना न्याय द्या. हे गरिबांचं सरकार आहे ना? मग हे लोक हिंदू नाहीत का? यांच्यावर लाठीहल्ला केलात, यांचा गुन्हा काय आहे? जर तुम्ही येत्या अधिवेशनात या समाजांसाठी निर्णय घेणार असाल तर तुमच्या अधिवेशन घेण्याच्या या निर्णयाचं आम्ही स्वागत करतो. माझ्या समाजाच्या भावनेचा आदर करा.

# हिंसाचाराच्या घटना तातडीने थांबवण्याची गरज!

## » दोषी पोलिसांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले : अजित पवार

।मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यातील अंतरवली येथे आंदोलन करणाऱ्या समाजबांधवांवर पोलिसांकडून झालेला लाठीमार, हवेतील गोळीबार, बळाच्या गैरवापरासंबंधी उच्चस्तरीय चौकशीचे आणि दोषी पोलिसांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.**

दरम्यान अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, या घटनेबाबत मराठा बांधवांसह सर्व महाराष्ट्रवासियांच्या भावना तीव्र आहेत. राज्य शासन देखील या भावनांशी सहमत असून शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. मराठा समाजाच्या नेत्यांसोबत चर्चा करुन या प्रश्नी तोडगा काढण्याची राज्य सरकारची तयारी आहे. राज्याच्या काही भागात बसगाड्यांवर दगडफेक, जाळपोळ, हिंसाचाराच्या घटना होत असून त्या तातडीने थांबवण्याची गरज आहे. अजित पवार म्हणाले की, दगडफेक, जाळपोळ, हिंसाचारात आपल्या राज्याच्याच संपत्तीचे नुकसान होत आहे. या आंदोलनामुळे नागरिकांना इजा होण्याची भीती आहे. त्यामुळे दगडफेक, जाळपोळ हिंसाचार टाळला पाहिजे. आजपर्यंत शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने सुरु असलेले आंदोलन यापुढेही त्याच मार्गाने पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.



मी मराठा समाज बांधवांना, मराठा संघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांना आवाहन करतो की, राज्याच्या काही भागात सुरु असलेला हिंसाचार थांबवण्यासाठी आपण पुढे यावे. राज्याच्या साधनसंपत्तीचे नुकसान होणार नाही. आंदोलनामुळे आपल्या माता-भगिनींच्या, बांधवांच्या जीवाला धोका होणार नाही, याची काळजी घ्यावी. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर तसेच अंबड तालुक्यातील लाठीमार घटनेसंदर्भात चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाची तयारी आहे. अजित पवार म्हणाले की, मराठा बांधवांच्या, महाराष्ट्राच्या हितासाठी राज्यात सुरु असलेला हिंसाचार तात्काळ थांबवला पाहिजे. राज्यात शांतता, कायदा-सुव्यवस्था कायम राहिल, यासाठी आपण सर्वांनी सहकार्य, प्रयत्न करुया, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जाळपोळीच्या, हिंसाचाराच्या घटनांबद्दल चिंता व्यक्त केली असून ह्या घटना थांबवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन मराठा आंदोलक नेत्यांना, कार्यकर्त्यांना केले आहे. राज्यातील नागरिकांनीही शांतता पाळून कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी शासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

### चर्चा करुन मार्ग काढू

» अजित पवार म्हणाले की, दगडफेक, जाळपोळ, हिंसाचारात आपल्या राज्याच्याच संपत्तीचे नुकसान होत आहे. या आंदोलनामुळे नागरिकांना इजा होण्याची भीती आहे. त्यामुळे दगडफेक, जाळपोळ हिंसाचार टाळला पाहिजे. आजपर्यंत शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने सुरु असलेले आंदोलन यापुढेही त्याच मार्गाने पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. मी मराठा समाज बांधवांना, मराठा संघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांना आवाहन करतो की, राज्याच्या काही भागात सुरु असलेला हिंसाचार थांबवण्यासाठी आपण पुढे यावे. राज्याच्या साधनसंपत्तीचे नुकसान होणार नाही. आंदोलनामुळे आपल्या माता-भगिनींच्या, बांधवांच्या जीवाला धोका होणार नाही, याची काळजी घ्यावी. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर तसेच अंबड तालुक्यातील लाठीमार घटनेसंदर्भात चर्चा करुन मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाची तयारी आहे.

# निवडणुकीआधी भाजपाला मोठा धक्का!

## आजी-माजी आमदारांसह 10 नेत्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मध्य प्रदेशात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. अशातच भारतीय जनता पार्टीला मोठा धक्का बसला आहे. राज्यातील एका विद्यमान आमदाराने आणि एका माजी आमदाराने काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कमलनाथ यांच्या उपस्थितीत भाजपा नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. यात दोन आजी-माजी आमदारांसह भाजपाचे एकूण १० नेते काँग्रेसमध्ये सामील झाले आहेत. कोलारसचे भाजपा आमदार वीरेंद्र रघुवंशी आणि माजी भाजपा आमदार भंवर सिंह शेखावत यांनी काँग्रेसचा झेडा हाती घेतला आहे. केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया आणि त्यांच्या समर्थकांचं पक्षातलं वाढतं महत्त्व हे या नेत्यांच्या पक्ष बदलण्यामागचं प्रमुख कारण असल्याचं सांगितलं जात आहे.



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कमलनाथ या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमावेळी म्हणाले, भाजपाने मध्य प्रदेशला भ्रष्टाचाराचं राज्य बनवलं आहे. 'पैसे द्या आणि काम मिळवा' अशी एक भ्रष्ट व्यवस्था यांनी राज्यात बनवली आहे. मुख्यमंत्री त्यांची पापं धुतली जावी म्हणून राज्यातल्या भगिनींना १,००० रुपये देत आहेत. त्यांची १८ वर्षांची पापं अशीच धुतली जातील असं त्यांना वाटतंय. परंतु, शिवराजजी, तुम्ही तिकडे मुंबईत जा आणि तुमची कलाकारी करा. या निवडणुकीनंतर मध्य प्रदेशची जनता तुम्हाला खूप प्रेमाने निरोप देणार आहे. काँग्रेस नेते कमलनाथ म्हणाले, भारतीय जनता पार्टीने मध्य प्रदेशला अराजक, घोटाळ्यांचं आणि भ्रष्टाचाराचं राज्य बनवलं आहे. मध्य प्रदेशचं भविष्य वाचवायचं असेल तर जनतेनं यांच्या अमिषाला बळी पडू नये. ते वेगवेगळी अमिषं दाखवतील, परंतु शिवराजजी तुम्ही ज्यांना ज्ञान द्यायला जाताय तेच तुम्हाला निवडणुकीत ज्ञान देतील. वीरेंद्र रघुवंशी : कोलारसचे आमदार वीरेंद्र रघुवंशी यांनी काही दिवसांपूर्वी ज्योतिरादित्य सिंधिया आणि त्यांच्या समर्थकांवर गंभीर आरोप करत भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. आता ते काँग्रेसवासी झाले आहेत. भंवर सिंह शेखावत : भाजपाचे माजी आमदार, दात्तीगावमधील भाजपाचं मोठं नेतृत्व, परंतु २०१८ च्या निवडणुकीत याच मतदारसंघात त्यांचा पराभव झाला होता. आता त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून पुन्हा एकदा ते या मतदारसंघातून निवडणूक लढवू शकतात. चंद्रभूषण सिंह बुंदेला उर्फ गुड्डू राजा : झाशीतून दोन वेळा खासदार म्हणून निवडून आलेल्या सुजान सिंह बुंदेला यांचे पुत्र चंद्रभूषण सिंह बुंदेला उर्फ गुड्डू राजा यांनीही काँग्रेसचा झेंडा हाती घेतला आहे. यांच्यासह डॉ. आशीष अग्रवाल, अशू रघुवंशी, छेदीलाल पांडे, शिवम पांडे, अरविंद धाकड, डॉ. केशव यादव आणि महेंद्र प्रताप सिंह यांनी कमलनाथ यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

### वन नेशन-वन इलेक्शन म्हणजे काय ?

» वीरेंद्र रघुवंशी : कोलारसचे आमदार वीरेंद्र रघुवंशी यांनी काही दिवसांपूर्वी ज्योतिरादित्य सिंधिया आणि त्यांच्या समर्थकांवर गंभीर आरोप करत भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. आता ते काँग्रेसवासी झाले आहेत भंवर सिंह शेखावत : भाजपाचे माजी आमदार, दात्तीगावमधील भाजपाचं मोठं नेतृत्व, परंतु २०१८ च्या निवडणुकीत याच मतदारसंघात त्यांचा पराभव झाला होता. आता त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून पुन्हा एकदा ते या मतदारसंघातून

# मणिपूरमध्ये गेल्या 4 दिवसांत 12 जणांचा मृत्यू!

## मेरी कोमने अमित शहांना लिहिले पत्र; म्हणाल्या- कोम जमाती वाचवा!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मणिपूरच्या चुराचंदपूर आणि बिष्णुपूर जिल्ह्यांच्या सीमेवरील बफर झोनमध्ये हिंसाचार सुरूच आहे. २९ ऑगस्टला तो पुन्हा भडकला. गेल्या चार दिवसांत 12 जणांचा मृत्यू झाला आहे, तर 18 जण गंभीर जखमी झाले आहेत. दोन्ही जिल्ह्यात लष्कर तैनात करण्यात आले आहे. सध्या सीआरपीएफ आणि आसाम रायफल्स येथील बफर झोनमध्ये तैनात आहेत.

त्याच वेळी, माजी विश्वविजेती बॉक्सर आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेती मेरी कोमने पुन्हा एकदा केंद्राकडे मदत मागितली आहे. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहिले आहे. केंद्रीय सुरक्षा दलांनी दोन्ही समुदायांना कोम गावात प्रवेश करण्यापासून रोखावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. दुसरीकडे, 1 सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि मणिपूर सरकारला हिंसाचारग्रस्तांना अन्न, औषधे आणि मूलभूत वस्तू पुरवण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जेबी परडीवाला यांच्या खंडपीठाने सरकारला वेगवेगळ्या संघटनांच्या नाकेबंदीला स्वतःहून सामोरे जाण्यास सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी 6 सप्टेंबर रोजी होणार आहे. खोइरांतक, चिंगपेई, खोशुबुंग आणि नारायणसेना येथे मेईतेई आणि कुकी हल्लेखोरांमध्ये 31 ऑगस्ट रोजी हिंसक संघर्ष झाला. यादरम्यान मोर्टार हल्ले आणि गोळीबारात पाच जण ठार झाले.




मृतांमध्ये मणिपूरमधील लोकप्रिय कुकी गायक मंगाबोई लुंगडीम यांचाही समावेश होता, ज्याने मे महिन्यात हिंसाचार सुरू झाल्यानंतर 'आय गम हिलाऊ हम' (ही आमची भूमी नाही का) हे गाणे लिहिले आणि गायले. मणिपूरमधील बिष्णुपूर-चुरचंदपूर सीमेवर 29 ऑगस्ट रोजी दोन गटांमध्ये गोळीबार झाला होता. यामध्ये ग्रामरक्षक दलाच्या दोन स्वयंसेवकांचा मृत्यू झाला. त्यात 7 जण जखमी झाले. नारन्सिना येथे हल्लेखोरांनी शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार केला. प्रत्युत्तर म्हणून स्वयंसेवकांनीही गोळीबार सुरू केला. लायबुजम इनाओ आणि जंगमिनलेन गंगेत अशी मृतांची नावे आहेत. बिष्णुपूरमधील नरनसिना येथे लायबुजामवर गोळ्या झाडण्यात आल्या. इंफाळ येथील रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. चुरचंदपूरच्या सोंगडो गावात हाणामारीत जंगमिनलेन जखमी झाला. पुढे त्याचाही मृत्यू झाला. मणिपूर पोलिसांनी 28 ऑगस्ट रोजी रिव्होल्युशनरी पीपल्स फ्रंट (RPF), बंदी घातलेल्या बंडखोर गटाची राजकीय शाखा, नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालिम इसाक-मुइवाह (NSCN-IM) च्या प्रत्येकी एका सक्रिय कॅडरला आणि दोन ओव्हर-ग्राउंड कॅडरला अटक केली. कांगलीपाक कम्युनिस्ट पार्टी (KCP) या कार्यकर्त्याला अटक करण्यात आली. इम्फाळ पूर्व आणि बिष्णुपूरमध्ये शोध मोहिमेदरम्यान 6 शस्त्रे, 5 दारूगोळा आणि 2 स्फोटके जप्त करण्यात आली. पोलिसांनी २९ ऑगस्ट रोजी याबाबत माहिती दिली होती. राज्याच्या इतर भागातही गोळीबार झाल्याचे सुरक्षा दलांनी सांगितले.

### हिंसाचारात 160 हून अधिक मृत्यू

» 3 मे पासून राज्यातील कुकी आणि मेईतेई समुदायांमधील हिंसाचारात 160 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान केंद्राने सांगितले होते की, मणिपूरमध्ये ६ हजार ५२३ एफआयआर नोंदवण्यात आल्या आहेत. त्यापैकी 11 प्रकरणे महिला आणि मुलांवरील हिंसाचाराशी संबंधित आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ७ ऑगस्ट रोजी सांगितले होते की, ४२ विशेष तपास पथके (एसआयटी) मणिपूरमधील हिंसाचाराच्या प्रकरणांची चौकशी करतील.

# शाहरुख-सुहाना एकाच चित्रपटात!



शाहरुखच्या जवानची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे. यावर्षीच्या जानेवारीमध्ये शाहरुखचा पठाण नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यानं तब्बल हजार कोटींची कमाई केली होती. आता त्याचा जवान हा चित्रपट प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास तयार आहे. तीन दिवसांपूर्वी जवानचा ट्रेलर प्रदर्शित झाला होता. त्याला किंग खानच्या चाहत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. जवानच्या ॲडव्हान्स बुकींगलाही चाहत्यांनी सर्वाधिक पसंती दिली आहे. अशातच शाहरुखबाबत एक मोठी बातमी समोर आली असून त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. बॉलिवूडचा किंग खान शाहरूख खानची लेक, सुहाना खान झोया अख्तरच्या 'द आर्चिज' या NETFLIX वरील चित्रपटातून पदार्पण करण्यास सज्ज झाली आहे. तिचं हे पदार्पण फक्त छोट्या पडद्यापुरतं मर्यादित राहणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. सुत्रांनुसार सुहाना आपल्या वडिलांसोबत चित्रपटसृष्टीतही पदार्पण करणार असल्याची चर्चा आहे. 'कहानी २' आणि 'बदला' सारख्या दमदार चित्रपटांसाठी ओळखला जाणारा सुजय घोष त्याचा नवीन चित्रपट शाहरूख आणि सुहाना सोबत करण्यास तयार असल्याचं यापूर्वीच उघड झालं होतं. पण आता INDIATODAY ने दिलेल्या एका वृत्तानुसार किंग खान आणि त्याची लाडकी लेक हे एका चित्रपटामध्ये दिसणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शाहरूखची भूमिका फक्त कॅमिओ म्हणून मर्यादित राहणार नसून ,'डियर जिंदगी' मध्ये साकारलेल्या भूमिकेसारखी असणार आहे. असं म्हटलं जात आहे की, सुजयचा चित्रपट एक स्पाय थ्रिलर असून त्यात सुहाना गुप्तहेराच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

## उर्वशीच्या इंस्टाला पाकिस्तानी खेळाडूचा फोटो

आशिया कप २०२३ च्या भारत विरुद्ध पाकिस्तानच्या सामन्यात भारतानं लाखो चाहत्यांची निराशा केली आहे. ज्या सामन्याची प्रत्येक भारतीय क्रिकेट चाहते वाट पाहत असतात त्या सामन्यात पाकिस्ताननं भारताच्या सलामीच्या फलंदाजांना स्वस्तात माघारी धाडले आहे. सोशल मीडियावर आता भारताच्या सलामीच्या फलंदाजांवर नेटकऱ्यांनी चांगलेच तोंडसुख घेतले आहे. त्यात रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल आणि श्रेयस अय्यर या सगळ्यांनी चाहत्यांची मोठ्या प्रमाणात निराशा केल्याचे दिसून आले आहे. अशातच बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री आणि सोशल मीडिया सेलिब्रेटी उर्वशी रौतेला चर्चेत आली आहे. त्याचे कारणही खास आहे. यापूर्वी उर्वशी ही भारताचा प्रसिद्ध फलंदाज ऋषभ पंतमुळे चर्चेत आली होती. ऋषभ आणि तिच्या अफेयरच्या बातम्याही व्हायरल झाल्या होत्या. नेटकऱ्यांनी त्यांच्याविषयी वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रियाही दिल्या होत्या. त्यातच उर्वशीच्या काही फोटोंवर पाकिस्तानच्या त्या वेगवान गोलंदाजानं प्रतिक्रियाही दिली होती. त्यावर उर्वशीनंही त्याला उत्तर दिले होते. त्याचीही बराचकाळ चर्चा रंगली होती. आता उर्वशीनं ज्या पाकिस्तानी गोलंदाजानं भारताच्या सलामीवीरांना बाद केले त्याचा फोटो इंस्टाच्या स्टोरीवर शेयर केला आहे. तो फोटो पाहताच नेटकऱ्यांचा संताप झाला आहे. त्यावर त्यांनी तिला चांगलेच सुनावले आहे. उर्वशी तुझ्या इंस्टाच्या स्टोरीला पाकिस्तानच्या नसीम शाहचा फोटो का ठेवला अशी विचारणाही केली आहे. त्यामुळे आता उर्वशी मोठ्या प्रमाणात ट्रोल होताना दिसत आहे. काही दिवसांपूर्वी याच नवीन शाहनं उर्वशीला लग्नासाठी मागणीही घातली होती. मात्र हे त्यानं गमतीत केले होते. त्याचे कारण असे की, उर्वशीनं त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या.

## तमन्नाचे चित्रपटसृष्टीत 18 वर्षे पूर्ण



अभिनेत्री तमन्ना भाटियाने चित्रपटसृष्टीत 18 वर्षे पूर्ण केली आहेत. या खास प्रसंगी, अभिनेत्रीने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर करून तिच्या संपूर्ण प्रवासाची झलक दाखवली आहे. व्हिडिओमध्ये तमन्नाच्या बाहुबली, जेलर, बाहुबली 2, लस्ट स्टोरीज-2 या चित्रपटांच्या क्लिप दिसल्या. व्हिडिओ शेअर करताना तमन्नाने एक लांबलचक कॅप्शनही लिहिले आहे. तिने लिहिले- 'किशोरवयीन स्वप्नांपासून प्रौढ भावनांपर्यंत. संकटात सापडलेली मुलगी आणि शेजारच्या मुलीपासून एका बदमाश बाउंसरपर्यंत आणि आता एक निर्भय अन्वेषक. हा प्रवास खूप छान झाला आहे. माझ्या पहिल्या खऱ्या प्रेमाच्या, अभिनयाच्या अनंतकाळच्या या प्रवासाला 18 वर्षे लागली. तमन्नाने पुढे लिहिले- 'या अद्भुत आठवणी लक्षात ठेवण्यासाठी थोडा वेळ मिळाला आणि मला त्या तुम्हा सर्वांसोबत शेअर करायच्या होत्या. स्वप्नांच्या या प्रवासात ज्यांनी मला सर्वात जास्त साथ दिली. धन्यवाद आणि मी तुम्हा सर्वांवर खूप प्रेम करते'. तमन्ना भाटियाने 2005 मध्ये चांद सा रोशन चेहरा या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम करून तिने खूप प्रसिद्धी मिळवली आहे. तमन्नाला प्रभासच्या 'बाहुबली' या सुपरहिट चित्रपटातून वेगळी ओळख मिळाली. या चित्रपटात तिने मुख्य भूमिका साकारली होती.

## वैजयंतीमालांनी केले भरतनाट्यम !

ज्येष्ठ अभिनेत्री वैजयंतीमाला यांनी 13 ऑगस्ट रोजी आपला 90 वा वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी भरतनाट्यम नृत्य सादर केले. त्यांच्या डान्सचा व्हिडिओ सोशल मीडियावर आला आहे. या व्हिडिओमध्ये वैजयंतीमाला वयाच्या 90 व्या वर्षीही चांगला डान्स करताना दिसत आहेत. अभिनेत्री पारंपारिक नृत्याच्या चालींवर उत्तम अभिव्यक्तीसह नाचताना दिसत आहेत. व्हिडिओमध्ये वैजयंती माला यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित गेट-टूगेदर पार्टीत स्टेजवर काही लोकांसमोर हा डान्स केला. त्यांच्या नृत्याच्या तालावर लोक मध्येच टाळ्या वाजवत आहेत. अभिनेत्रीने सुमारे 4 मिनिटे सलग नृत्य केले. सोशल मीडिया यूजर्स या व्हिडिओवर कमेंट करत अभिनेत्रीचे कौतुक करत आहेत. एका युझरने व्हिडिओवर लिहिले - त्यांनी हे सर्व अतिशय उत्तमरित्या केले आहे. या वयातही त्यांची मुद्रा आणि त्यांचे भाव अगदी परफेक्ट आहेत. त्याच वेळी, एका वापरकर्त्याने लिहिले - वैजयंतीमाला वयाच्या 90 व्या वर्षी परिपूर्ण भरतनाट्यम नृत्य करत आहेत आणि वयाच्या 20 व्या वर्षी हे टाइप करताना माझी पाठ दुखत आहे.1950-60 च्या दशकात नागिन, देवदास, साधना, सरगम, गंगा जमुना यांसारख्या चित्रपटांमध्ये अभिनयाने

## चिरंजीवीच्या पिस्तुलाने आत्महत्येचा प्रयत्न

साऊथचा पॉवर स्टार पवन कल्याणचा आज 52 वा वाढदिवस आहे. पवनने आतापर्यंत जवळपास 33 चित्रपटांत काम केले आहे. तो अभिनयात चांगला असल्याने त्याला पॉवर स्टार ही पदवी मिळाली, परंतु त्याचे वैयक्तिक जीवन चढ-उताराने भरलेले राहिले. लहान वयातच नैराश्याने ग्रासले, आत्महत्येचा प्रयत्नही केला. पवन म्हणायचा की तो कधीच लग्न करणार नाही, पण नंतर त्याने तीन लग्ने केली. पहिली पत्नी नंदिनीला घटस्फोट न देता तो त्याची सहकलाकार रेणूसोबत राहत होता. यामुळे संतापलेल्या नंदिनीने पवन आणि चिरंजीवीसह संपूर्ण कुटुंबाविरुद्ध गुन्हा दाखल केला. घटस्फोटानंतर पवनला 5 कोटी रुपये पोटगीही द्यावी लागली. भावाला आर्थिक मदत केल्याने दुसऱ्या पत्नीने त्याला घटस्फोट दिला. सर्वजण त्याला



पवन कल्याण या नावाने

ओळखतात, परंतु त्याचे खरे नाव कोनिडेला कल्याण बाबू आहे. पवन कल्याण हे नाव धारण करण्यामागे एक कथा आहे. सुरुवातीपासूनच तो खेळात चांगला होता. कराटेमध्येही ब्लॅक बेल्ट आहेत. एके दिवशी मार्शल आर्ट्सचे सादरीकरण होता, त्यादरम्यान त्याने त्याच्या नावासोबत पवन जोडले. हे नाव त्याला खूप आवडले. नंतर त्याने चित्रपटांसाठी पवन कल्याण हे नाव वापरण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे कल्याण बाबू पवन कल्याण झाला. पवन कल्याणने एका मुलाखतीत सांगितले की, 'मी अगदी लहान कुटुंबातून आलो आहे. अगदी लहानशा शाळेतून शिक्षण पूर्ण केले. माझ्या घरच्यांनी सांगितल्याप्रमाणे मी करत राहिलो. स्वतःबद्दल विचार करण्याची संधी मिळाली नाही. याचा माझ्या अभ्यासावरही परिणाम झाला आणि मी नापास होत राहिलो. मी अभ्यासावर कमी आणि इतर गोष्टींवर जास्त लक्ष केंद्रित करायचो. यावेळी मला दमा झाला आणि काही दिवस हॉस्पिटलमध्ये भरती व्हावे लागले. लोकांना भेटणेही कमी झाले. बरं, मी स्वतः फारसा सामाजिक माणूस नाही, पण काही काळानंतर या गोष्टी मला त्रास देऊ लागल्या आणि मी डिप्रेशनमध्ये गेलो.

# भारत पाकिस्तान सामना रद्द!

## » आशिया चषकात पाकच्या डावाला प्रारंभच झाला नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया चषकात शनिवारी भारत-पाकिस्तान सामना पावसामुळे रद्द झाला. भारतीय संघाने पाकिस्तानला विजयासाठी २६७ धावांचे लक्ष्य दिले होते. पावसामुळे पाकिस्तानच्या डावाची सुरुवातही होऊ शकली नाही. भारतीय वेळेनुसार पहिला डाव 7:44 वाजता संपला. त्यानुसार दुसरा डाव 8:14 ला सुरू होणार होता.**



सामन्याची कटऑफ वेळ 10:27 वाजता निश्चित करण्यात आली होती. म्हणजेच या वेळेपर्यंत सामना पुन्हा सुरू झाला असता तर पाकिस्तानचा डाव किमान 20 षटकांचा राहिला असता. एकदिवसीय सामन्यात निकाल येण्यासाठी 20 षटकांचा खेळ आवश्यक आहे. मात्र, त्यावेळपर्यंतही पाऊस थांबला नसल्याने सामना 9:50 वाजता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. भारताचा पुढचा सामना 4 सप्टेंबरला नेपाळ विरुद्ध कँडीतच होणार आहे. टीम इंडियाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करताना 48.5 षटकांत सर्वबाद 266 धावा करत पाकिस्तानला विजयासाठी 287 धावांचे आव्हान दिले. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदीने 4, नसीम शाह आणि रौफने प्रत्येकी 3 विकेट घेतल्या. भारताकडून हार्दिक पंड्याने सर्वाधिक 87, इशान किशनने 82 धावांची दमदार खेळी केली. दहाव्या विकेटच्या रुपात आऊट होणाऱ्या बुमराहनेही शेवटच्या षटकांत मौल्यवान 16 धावांचे योगदान दिले. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाची पाकिस्तानी गोलंदाजांसमोर दाणादाण उडाल्याचे पाहायला मिळाले. अवघ्या 66 धावांवर भारताचे आघाडीचे चार फलंदाज तंबूत परतले होते. त्यानंतर ईशान किशन आणि हार्दिक पांड्या यांनी भारताचा डाव सावरला. दोघांनी पाचव्या विकेटसाठी अर्धशतकी भागिदारी केली. टीम इंडियाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. संघाने 4.2 षटकांत बिनबाद 15 धावा केल्या आहेत.

### विराट कोहली 4 धावांवर बाद

» नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या टीम इंडियाची सुरुवात संथ झाली. टीमने 4.2 ओव्हरपर्यंत नाबाद 15 धावा केल्या होत्या. त्याचवेळी पाऊस सुरू झाला. पावसानंतर खेळ सुरू झाला तेव्हा भारताने 10 चेंडूंमध्येच 2 विकेट गमावल्या. कर्णधार रोहित शर्मा 11 आणि विराट कोहली 4 धावांवर बाद झाले. दोघांनाही शाहीन शाह आफ्रिदीने बोल्ड केले. नंतर 10 व्या ओव्हरमध्ये हारिस रऊफने श्रेयस अय्यरला झेलबाद केले. अय्यर 14 धावांवर बाद झाला.

कर्णधार रोहित शर्मा (11) आणि शुभमन गिल (0) असताना पाऊस आला. काही वेळ सामना थांबल्यानंतर सामना पुन्हा सुरू झाला. त्यानंतर सामना सुरू होताच शाहीन शाह आफ्रिदीने रोहितचा त्रिफळा उडवत त्याला बाद केले. त्यानंतर मैदानावर आलेल्या किंग कोहलीने उत्तम चौकार खेचत चांगली सुरुवात केली. मात्र त्याला फार काळ मैदानावर टिकता आले नाही. शाहीन शाह आफ्रिदीने त्यालाही बोल्ड करत भारताला दुसरा धक्का दिला. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर आलेलाल श्रेयस अय्यरही फार काळ टिकू शकला नाही. तो अवघ्या 14 धावा करून बाद झाला. हरिस रौफने त्याला झेलबाद केले. त्यानंतर सलामीपासून सावध खेळत मैदानावर टिकलेला गिलही बाद झाला. रऊफने त्रिफळा उडवत गिललाही परत पाठवले. तोही अवघ्या 10 धावा करू शकला. त्यानंतर मात्र ईशान किशन आणि हार्दिक पांड्या यांनी भारताचा डाव सावरला. स्कोअरकार्ड सतत हलते ठेवत दोघांनी चांगली फलंदाजी केली. ईशान किशनने 6 चौकार आणि एक षटकार खेचत अर्धशतकी खेळी केली.

# गतविजेता कार्लोस अल्काराझने गाठली तिसरी फेरी!

## » कार्लोसने हॅरिसचा केला पराभव; ओन्स जेब्युअरनेही गाठली

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**गतविजेता कार्लोस अल्काराझने गुरुवारी दक्षिण आफ्रिकेच्या लॉयड हॅरिसचा पराभव करून हंगामातील शेवटच्या ग्रँडस्लॅम यूएस ओपनची तिसरी फेरी गाठली. अलेक्झांडर झ्वेरेव्हनेही पुरुष एकेरीत तिसरी फेरी गाठली आहे. महिला एकेरीत गेल्या वर्षीची उपविजेती ओन्स जेबूरनेही तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.**




स्पेनच्या 20 वर्षीय कार्लोस अल्काराझने न्यूयॉर्कमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात हॅरिसचा 6-3, 6-1, 7-6(4) असा पराभव करून यूएस ओपनच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. जर्मनीच्या 12व्या मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्हनेही तिसरी फेरी गाठली. झ्वेरेव्हने देशबांधव डॅनियल ऑल्टमायरचा ७-६ (७/१), ३-६, ६-४, ६-३ असा पराभव करत तिसऱ्या फेरीत स्थान निश्चित केले.

ट्युनिशियाच्या पाचव्या मानांकित खेळाडू झेबूअरने गुरुवारी झालेल्या रोमहर्षक लढतीत झेकची युवा टेनिसपटू लिंडा नोस्कोव्हा हिचा 7-6(7), 4-6, 6-3 असा पराभव केला. जेब्युअरने 18 वर्षांच्या नोस्कोवावर सतत दबाव कायम ठेवला. स्टार टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने वर्षातील शेवटच्या ग्रँडस्लॅम यूएस ओपनची तिसरी फेरी गाठली आहे.

23 वेळचा ग्रँडस्लॅम विजेता जोकोविचने बुधवारी यूएस ओपनच्या दुसऱ्या फेरीत स्पेनच्या बर्नबे झपाटा मिरालेसचा सरळ सेटमध्ये पराभव केला. जोकोविचने आर्थर ॲशे स्टेडियमच्या कोर्टवर 76व्या मानांकित मिरालेसविरुद्ध दोन तासांत 6-4, 6-1, 6-1 असा विजय मिळवला. सर्बियन स्टारचा पुढील सामना देशबांधव आणि 32व्या मानांकित लास्लो जेरेशी होणार आहे.

### रोमहर्षक लढतीत जेबुआरने बाजी मारली

» स्पेनच्या 20 वर्षीय कार्लोस अल्काराझने न्यूयॉर्कमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात हॅरिसचा 6-3, 6-1, 7-6(4) असा पराभव करून यूएस ओपनच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. जर्मनीच्या 12व्या मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्हनेही तिसरी फेरी गाठली.
झ्वेरेव्हने देशबांधव डॅनियल ऑल्टमायरचा ७-६ (७/१), ३-६, ६-४, ६-३ असा पराभव करत तिसऱ्या फेरीत स्थान निश्चित केले. ट्युनिशियाच्या पाचव्या मानांकित खेळाडू झेबूअरने गुरुवारी झालेल्या रोमहर्षक लढतीत झेकची युवा टेनिसपटू लिंडा नोस्कोव्हा हिचा 7-6(7), 4-6, 6-3 असा पराभव केला. जेब्युअरने 18 वर्षांच्या नोस्कोवावर सतत दबाव कायम ठेवला.